December - 2019 1145 (2)

# माहीती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत माहीतीसाठी अर्ज

प्रति,
जन माहीती अधिकारी,
विधी विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर

[Stamp: भाईंदर महानगरपालिका विधी विभाग आवक क्र. 02 मा. अ. दिनांक 16/12/19]

[Court fee stamp: 10 रु. Rs.10 COURT FEE INDIA दस रुपये TEN RUPEES 27 NOV 2019]

१ **अर्जदाराचे पूर्ण नांव :** अमोल गणपत रक्वी.

२ **अर्जदाराचा पूर्ण पत्ता :** २०३, गार्डन व्हयू अपार्टमेंटस'
बबन वैद्य रोड, ताम तलाव, वसई ४०१ १०१

३ **हव्या असलेल्या माहीतीचे वैशिष्ठय:**

अ **माहीतीचा विषय :**

**मौजे भाईंदर, स. क्र. ६७५ हि. क्र. १ व ६ या जागातील कुंमणास बांधकाम परवानगी**

आ **माहीतीचा कालावधी :** ०१.०६.२०११ ते १३.१२.२०१९

इ **हव्या असलेल्या माहीतीचा तपशील:**

दि. २९.११.२०१९च्या सुनावणीत रक्वी कुटूंबियाची सामायिक मालकीच्या उपरोक्त २ जागात श्री श्यामसुंदर अग्रवाल यांना कुंमणाच्या बांधकामासाठी परवानगी दिल्याचे व या बाबत श्री श्यामसुंदर अग्रवाल यांचेवर न्यायालयाच्या अवमानाबाबत क्र. ५०४:१८ ही याचिकाही प्रलंबित असल्याचे कळते. यासाठी मला खालील माहीती त्वरित द्यावी. **आवश्यक तर कागदपत्रे अवलोकन करून शुल्क भरून प्रति घेईन.**

१ एखाद्या नागरिकाने आपल्या खाजगी जागेला वा जागेत असे कुंमण बांधण्यासंबंधीचा महानगरपालिकेची परवानगी घेण्याची आवश्यकता असल्याबाबत असलेला नियम आणि त्या साठी दाखल कराव्या लागणारया कागदपत्रांची माहीती. (नर)

२ एखाद्या नागरिकाने आपल्या खाजगी जागेला वा जागेत असे कुंमण बांधण्यासंबंधीचा महानगरपालिकेची परवानगी घेण्याची आवश्यकता नसल्यास तसे कळवा. (नर)

३ श्री श्यामसुंदर अग्रवाल यांनी मौजे भाईंदर,स.क्र. ६७५ हि.क्र. १ व ६ या जागांबाबतीत असे कुंमण बांधण्यासंबंधीत झालेल्या केसची माहिती द्यावी व त्यात त्यांनी असा नियमानुसार अर्ज केला असल्यासत्यासोबत जोडलेल्या आवश्यक कागदपत्रांची माहिती द्यावी. (नर)

४ या केसमध्ये श्री श्यामसुंदर अग्रवाल यांनी त्या जागा त्यांच्या एकट्याच्या असल्याचा पुरावा म्हणून ७/१२चे उतारे दाखल केले असल्यास त्याची माहिती द्यावी. (नर)

५ या केसमध्ये श्री श्यामसुंदर अग्रवाल यांनी मिळवलेल्या स्थगिती आदेशाची व तो कधी उठवला गेला त्याची माहिती द्यावी.

६ या केसमध्ये त्यांनी भाईंदर,स.क्र. ६७५ हि.क्र. १,६ जागांच्या कुंमणासाठी सामायिक मालकांचे कुलमुखत्यारपत्र दाखल केले असल्यास त्याची माहीती. नसल्यास तसे कळवा. (नर)

४ **माहीती कशा तहेने हवी:** माहीती तयार होताच ९९३०८३८३८४ वर कळवावे.

५ **अर्जदार दारीद्रय रेषेखाली आहे का ?** नाही

Jadhav Lee 16/12/19

ठिकाणः वसई दिनांकः १३.१२.२०१९ अर्जदाराची स्वाक्षरी

RIGHT TO INFORMATION

o/c

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०२/२०१९-२०
दि. ०१/०१/२०२०

प्रति,
श्री. अमोल गणपत रकवी
२०३, गार्डन व्हयु अपार्टमेंट,
बबन वैद्य रोड, ताम तलाव,
वसई ४०१२०१

**विषय :-** केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज.

**संदर्भ :-** आपला दि. १३/१२/२०१९ (प्राप्त दि. १६/१२/२०१९) रोजीचा अर्ज.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय अर्जान्वये आपण मौजे भाईंदर, सं. क्र. ६७५ हि. क्र. १ व ६ या जागेतील कुंपणभिंतीच्या बांधकामाबाबत न्यायालयीन प्रकरणाची तसेच इतर कागदपत्रांची मुद्दा क्र. १ ते ६ नुसार माहिती अपेक्षिली आहे. तरी आपणास खालील मुद्यांनुसार माहिती उपलब्ध करुन देत आहे.

**मुद्दा क्र. १, २, ४ व ६ :-** सदरचे मुद्दे नगररचना विभागाशी संबंधित आहेत.

**मुद्दा क्र. ३ व ५ :-** मौजे : भाईंदर सर्वे क्र. ६७५, हि. क्र. १ व ६ या जागेवरील पत्र्याच्या कुंपणभिंतीबाबत श्री. श्यामसुंदर अग्रवाल यांनी **महानगरपालिकेची परवानगी न घेता बांधकाम केल्यामुळे** सदर कुंपणभिंतीच्या बांधकामास दि. ०८/०२/२०१३ रोजी प्रभाग अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी यांचे मार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० नुसार बजावण्यात आली होती. सदर नोटिसीच्या अनुषंगाने संबंधित प्रभाग अधिकारी यांनी सुनावणी घेऊन सुनावणी अंती दि. १२/०४/२०१३ रोजी पारित केलेल्या आदेशाविरुध्द श्री. श्यामसुंदर राधेश्याम अग्रवाल यांनी महानगरपालिकेविरुध्द स्पे. सि. सु. क्र. २८६/२०१३ अन्वये दावा दाखल करण्यात आला.

सदर दाव्यामध्ये मा. न्यायालयाने दोन्ही पक्षकारांस जैसे-थे स्थिती ठेवणेबाबतचे आदेश दिले असतानाही सदर विकासक यांनी दि. १९/०५/२०१३ रोजी सुट्टिच्या दिवशी पुन्हा नव्याने लोखंड अँगल पत्रा सहाय्याने सदर जागेत कुंपणाचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले असल्याने विकासकाविरुध्द अवमान अर्ज दाखल करणेकरीता प्रभाग कार्यालयाने दि. ०७/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये इकडील विभागास कळविले

असता श्री. श्यामसुंदर अग्रवाल यांचे विरुध्द मनपाच्यावतीने एम. ए. क्र. ५५५/२०१३ अन्वये अवमान अर्ज दाखल करण्यात आला.

दरम्यानच्या काळात विकासक यांनी विषयांकित जागेवर कुंपणभिंत घालण्यास परवानगी मिळणेबाबत दि. ०४/०३/२०१३ रोजी नगररचना विभागाकडे केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने नगररचना विभागाने जा.क्र.मनपा/नर/३६०७/२०१३-१४ अन्वये दि. २०/१२/२०१३ रोजी विषयांकित जागेवर लोखंडी पत्र्याचे कुंपण घालण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे दावा क्र. आर. सी. एस. २८६/२०१३ मागे घेणेकरीता वादी यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे अर्ज केला असता मा. न्यायालय, ठाणे यांनी सदर दाव्यात Suit Withdrawn चे आदेश पारीत करुन दि. २५/०७/२०१५ रोजी निकाली काढला आहे.

तद्नंतर सदर प्रकरणाबाबत श्री. अमोल रकवी यांनी पाठपुरावा केला असता मनपाच्यावतीने मा. न्यायालयात दाखल करण्यात आलेला अवमान अर्ज क्र. ५५५/२०१३ च्या सद्यस्थितीबाबत मा. न्यायालय, ठाणे यांच्या अधिकृत संकेतस्थळावर शोध घेतला असता सदरची अवमान याचिका मा. न्यायालयाने दि. ०८/०३/२०१६ रोजी याचिकेदार सतत गैरहजर राहत असल्याने (Dismissed for non-prosecution) फेटाळली असल्याचे निदर्शनास आले असता सदरचा अवमान अर्ज पुन्हा Restore करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजुरीन्वये मनपा अभियोक्त्या श्रीम. राजश्री बनसोड यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे सिव्हिल एम. ए. क्र. ५०४/२०१८ दाखल केले आहे. सदर सिव्हिल एम. ए. क्र. ५०४/२०१८ महानगरपालिकेच्यावतीने साक्ष दाखल करणेकरीता प्रलंबित आहे.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. दिपक पुजारी, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), चौथा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Xunadke

सई वडके<br>
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत कार्यवाहीकरीता :-**

**मा. जनमाहिती अधिकारी तथा नगररचनाकार, नगररचना विभाग**

(वरील अर्जातील मुद्दा क्र. १,२,४ व ६ आपल्या विभागाशी संबंधित असल्याने सदरचा अर्ज आपणास वर्ग करण्यात येत आहे. सदर अर्जातील मुद्यांची माहिती मुदतीत अर्जदार यांना आपल्या विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात यावी.)

C:\Users\Vibhuti\AppData\Local\Temp\Amol Rakvi.doc

M.A. 02/01/2020

03/01/2020

लिपिक<br>
नगररचना विभाग<br>
मी. भा. म.